" आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता, कौशल्य व सृजनशीलतेचा त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर होणारा परिणाम: एक सहसंबंधात्मक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पीएच.डी.

पदवी करिता सादरकेलेला संशोधन आराखडा

संशोधक

अरुण किसन कांबळे

(एम.ए.राज्यशास्त्र,एम.ए. शिक्षणशास्त्र,सेट शिक्षणशास्त्र)

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. माने मारुती शिवराम

(एम.ए.मराठी, इतिहास, अर्थशास्त्र,एम.एड्., डी.सी.एम., पीएच.डी.)

अभ्यास केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल,स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

शैक्षणिक वर्ष – मार्च 2022

Edit with WPS Office

“आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता, कौशल्य व सर्जनशीलतेचा त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर होणारा परिणाम : एक सहसंबंधात्मक अभ्यास”

प्रस्तावना:-

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे समाजात वावरत असताना अनेक प्रकारच्या गरजा निर्माण होतात. जसे- अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच शिक्षण हे आजच्या काळात मानवाची अतिशय महत्त्वाची गरज आहे. शिक्षण घेणे हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. व्यक्ती निरक्षर असेल तर त्यांचे किती मोठे नुकसान होते हे महात्मा ज्योतिराव फुले यांनी खालील प्रमाणे पटवून सांगितलेले आहे.

“विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली

नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले

वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.”

भारतात शिक्षणाची खरी सुरुवात ब्रिटिशांच्या राजवटीत सुरू झाली. ब्रिटिश राजवटीत अनेक मिशनरी लोकांनी आदिवासी समाजाला शिक्षण देण्याचे प्रयत्न केले ब्रिटीशांना आपली सत्ता सांभाळण्यासाठी कारकुनी वर्गाची आवश्यकता होती. व त्यासाठी त्यांनी त्या स्वरूपाचे शिक्षण देण्यास सुरुवात केली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शिक्षणावर खऱ्या अर्थाने भर देण्यात आला. अनुसूचित जमातीच्या शिक्षणाला महाराष्ट्रात 1 मे 1960 नंतरच भरीव स्वरूपाची सुरुवात झाली. याच काळात अनेक स्वयंसेवी संस्थांनी आदिवासी विकासासाठी प्रयत्न केले. शासनातर्फे स्वतंत्र आदिवासी विकास संचलनाची 1968 मध्ये राज्य स्तरावर स्वतंत्र आदिवासी विकास मंत्रालय विभाग अस्तित्वात आला आहे.

आदिवासी जमातीत कुटुंब आणि शेयनगृहाच्या माध्यमातून जीवन शिक्षण देण्यात येत असे. हे शिक्षण अनौपचारिकरीत्या या देण्यात येई. परंतु या क्षेत्रातील औद्योगिकरण, शहरीकरण आणि आधुनिक पाठशाळांच्या आरंभायामुळे आदिवासी मुले शेयनगृहाऐवजी शाळेमध्ये जाऊ लागली. शिक्षणाचे माध्यम, विषय आणि पद्धतीत बदल झाला. मिशनऱ्यांनी इंग्रजी भाषा व रोमन लिपीचा स्वीकार केला. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर कोणती लिपी स्वीकारावी ? शिक्षणाचे माध्यम कोणते असावे ? असे प्रश्न उद्भवले. आज आदिवासींच्या मौखिक साहित्य लुप्त होत आहे. लोकांमध्ये निरक्षरतेचा प्रश्न गंभीर आहे. शाळेत जाणाऱ्या मुलांमध्ये गळतीचे प्रमाण अधिक आहे. शाळेला लागणारे साहित्य, इमारत तसेच शिक्षकांच्या स्वयंप्रेरणेने आवश्यक असणारा सहभाग आढळत नाही.

Edit with WPS Office

ब्रिटिश काळापासून ते आजपर्यंत अनेक योजना सुरू करून देखील आदिवासी समाजातील शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी आहे. याचे मुख्य कारण हा समाज दऱ्याखोऱ्यात राहत असून त्यांना या योजनांचा म्हणावा तेवढा फायदा झालेला नाही. त्यामुळे त्यांचे शिक्षणातील प्रमाण कमी राहिले आहे. त्यातच त्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणी व समस्यांना सामोरे जावे लागते. आदिवासी जमातीत अनेक छोट्या-मोठ्या जमाती असून त्यातीलच गोंड जमात ही एक आहे जी दऱ्याखोऱ्यात वास्तव्यास आढळते त्यांची शैक्षणिक स्थिती अतिशय बिकट असून शासकीय योजनांचा परिणाम हवा तसा झाल्याचे दिसून येत नाही त्यामुळे गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या वेगवेगळ्या क्षमता वेगवेगळी कौशल्य व त्यांच्यात असलेली सृर्जनशीलता प्रस्तुत संशोधनातून अभ्यासली जाणार आहे . गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या ह्या घटकांमुळे शिक्षणाकडे काही दुर्लक्ष होते का? त्यांच्या शैक्षणिक प्रगती काही अडचणी निर्माण होतात का? किंवा त्यांच्याकडे असलेल्या या गुणवैशिष्ट्यांमुळे शैक्षणिक संपादणूकीस काही फायदा करून देता येतो का याचा विचार प्रस्तुत संशोधनातून संशोधक करणार आहेत, आदिवासीतील गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कौशल्यांना, सृर्जनशील घटकांना चालना देऊन त्याच क्षेत्रात त्यांना विकास करण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणे शक्य आहे का? या दृष्टीने या संशोधनात अभ्यास केला जाणार आहे ज्यातून आदिवासीतील गोंड जमातीतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख कसा उंचावला जाईल व किनवट माहूर तालुक्यातील गोंड जमातीची सामाजिक-आर्थिक व राजकीय स्थिती कशी सुधारेल याचा विचार संबंधित अभ्यासातून केला जाणार आहे

म्हणूनच प्रस्तुत संशोधन आदिवासी गोंड विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना कोणकोणत्या समस्या , अडचणी येतात व त्या का येतात हे शोधण्यासाठी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या क्षमता ,कौशल्य व सृर्जनशीलता या घटकांचा अभ्यास करून त्याचा परिणाम व सहसंबंध शैक्षणिक दृष्टीने अभ्यास ला जाणार आहे संशोधकाने आदिवासीतील गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या गुणांमुळे त्यांच्या शैक्षणिक संपादणूकीवर काय परिणाम होतो आणि त्याचा सहसंबंध कसा जोडता येईल हे शोधण्याच्या प्रामाणिक हेतूने हे संशोधन कार्य हाती घेण्यात आलेले आहे.

संशोधनाची गरज व महत्त्व:-

आज प्रत्येक देश आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, वैज्ञानिक विकास करण्यासाठी धडपडत आहे तर भारत हा महासत्ता बनविण्याच्या तयारीत आहे. देशाचा विकास करायचा असेल तर त्या देशातील समाजाचा विकास होणे आवश्यक आहे. समाजाचा विकास म्हणजेच व्यक्तीचा विकास होय. यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. त्यासाठी केंद्रात स्वतंत्र मानव संसाधन मंत्रालयाची स्थापना करण्यात आलेली आहे.

आपल्या देशातील प्रचंड लोकसंख्येतील एक मोठा घटक शिक्षणापासून वंचित आहे. त्यामध्ये आदिवासी जमातीचा समावेश आहे. केंद्र व राज्य सरकार आदिवासी समाजाच्या शिक्षणासाठी विविध योजना कार्यान्वित करीत आहे. तरीपण आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांचा अजूनही म्हणावा तेवढा विकास झालेला नाही. या समाजाचे शिक्षणातील प्रमाण

Edit with WPS Office

इतर समाजाच्या मानाने अत्यंत कमी आहे. त्यामुळे हे संशोधन करणे महत्त्वाचे ठरते.

आदिवासी जमातीतील गोंड जमात ही अतिशय मागासलेली असून किनवट, माहूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात या जमातीची लोकसंख्या आहे. गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती किनवट ,माहूर तालुक्यात हा खालावलेली असून त्यामागील अनेक कारणे असू शकतात, तरीपण गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या क्षमता त्यांच्याकडे असलेले कौशल्य व सृजनशीलता या घटकांचा त्यांच्या शैक्षणिक संपादणूकीवर परिणाम होतो. याचा विचार करून त्यांच्या अंगी असलेल्या गुणवैशिष्ट्यांचा शिक्षणामध्ये योग्य सदुपयोग व्हावा यादृष्टीने संशोधकाने प्रस्तुत संशोधनात आदिवासी जमातीतील गोंड विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या क्षमता, कौशल्य व सृर्जनशीलतेचा त्याच्या शैक्षणिक संपादणूकीवर होणारा परिणाम आणि सहसंबंध यांचा अभ्यास करण्याचे ठरवलेला आहे यातून आदिवासीतील गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी ज्या काही उपाययोजना सुचवणे शक्य आहे. त्यासाठीच हा संशोधन विषय निवडण्यात आलेला आहे.

संशोधन समस्या विधान :-

“ आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता, कौशल्य व सर्जनशीलतेचा त्यांच्या शैक्षणिक संपादणूकीवर होणारा परिणाम : एक सहसंबंधात्मक अभ्यास”

संशोधन समस्या विधानातील पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या:-

1) **आदिवासी** :-

गिलीन आणि गिलीन-

“एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा समान बोली भाषा बोलणारा व एकाच सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात.”

डब्ल्यू. जे. पेरी-

“समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात.”

2) **क्षमता** :-

क्षमता म्हणजे काहीतरी करण्याची किंवा पूर्ण करण्याची शारीरिक किंवा मानसिक शक्ती.

3) **कौशल्य:-**

कोणत्याही शास्त्राचे कलेचे किंवा हस्तकलेच्या सादरीकरण व व्यावहारिक जीवनात उपयोजन करण्याची क्षमता म्हणजे कौशल्य होय.

Edit with WPS Office

4) सर्जनशीलता:-

नवीनतेला जन्म देणारी एक क्षमता म्हणजे सर्जनशीलता होय.

संशोधनाची उद्दिष्टे :-

1)आदिवासी तील गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.

2)आदिवासी तील गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा अभ्यास करणे .

3)आदिवासी तील गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांकडे असलेल्या कौशल्याचा शोध घेऊन अभ्यास करणे

4)आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सृर्जनशीलतेचा शोध घेणे.

5)आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता कौशल्य व सृर्जनशीलता या घटकांचा त्यांच्या शैक्षणिक संपादणूकीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

6)आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता कौशल्य व सृर्जनशीलतेचा त्यांच्या शैक्षणिक संपादणूकीशी असणारा सहसंबंध अभ्यासणे.

7)आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता कौशल्य व सृर्जनशीलतेचा शैक्षणिक संपादणूकीवर होणारा परिणाम स्पष्ट करून उपाययोजना सुचविणे.

संशोधनाची परिकल्पना :-

1)आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांना अनेक क्षमता आहेत त्या अभ्यास .

2)आदिवासी गोंड जमातीच्य विद्यार्थ्यांमध्ये असणारी सृर्जनशीलता अभ्यासणे.

3)आदिवासी गोंड आदिवासी तील गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीवर परिणाम होतो .

4)आदिवासी गोंड जमातीतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूकीशी, त्यांच्या अंगी असलेली क्षमता कौशल्य व सृर्जनशीलतेचा संबंध असतो .

संशोधनाची गृहितके :-

1)आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यात अनेक क्षमता असतात.

2)आदिवासी तील गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अंगी सृर्जनशील गुण आहेत .

3)आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या क्षमता कौशल्य व सृर्जनशीलतेचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक संपादणूकीवर होतो

Edit with WPS Office

4)आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता कौशल्य व सृर्जनशीलतेचा त्यांच्या शैक्षणिक संपादणूकिशी सहसंबंध असतो .

5)आदिवासी तील गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता कौशल्य व सृर्जनशीलतेचा योग्य शैक्षणिक उपयोग करून घेता येतो.

संशोधन पद्धती :-

संशोधनाची कार्यपद्धती निश्चित करताना अनेक वर्षाचा विचार करून कार्यपद्धती ठरवावी लागते. संशोधनात अनेक साधनांचा उपयोग केल्या जातो. त्या साधनांची निश्चिती करणे महत्त्वाचे असते. त्यामुळे न्यादर्श निवडीसाठी उपयुक्त विचार करूनच कार्यपद्धती ठरविण्यात येते.

संशोधनात वापरल्या जाणाऱ्या संशोधन पद्धती, साधने आणि न्यादर्श निवड इत्यादी तात्विक भाग विचारात घेऊन करण्यात येते. याचे मुख्य कारण असे की, कोणत्याही कामातील उद्देश समजून घेण्यासाठी त्यामागील तात्विक भागामुळे त्या साधनांचे व संशोधन पद्धतीचे संशोधनासाठी असणारे महत्त्व काय? हे समजण्यास मदत होते. तसेच संशोधनासाठी प्रत्यक्ष पद्धती कशा प्रकारे राबविणार त्यामागची उद्दिष्टे कोणती आहे याचे आकलन होते. कोणत्याही विषयाचे संशोधन करीत असताना विविध संशोधन पद्धतीचा वापर केला जातो. संशोधनासाठी खालील पद्धती वापरल्या जातात.

अ) ऐतिहासिक संशोधन पद्धती

ब) वर्णनात्मक संशोधन पद्धती

क)प्रायोगिक संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी " आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता, कौशल्य व सर्जनशीलतेचा त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर होणारा परिणाम : एक सहसंबंधात्मक अभ्यास" या समस्येचे संशोधन करण्यासाठी संशोधकांनी वर्णनात्मक संशोधन पद्धती म्हणजेच **सर्वेक्षण पद्धतीचा** वापर केला जाणार आहे.

सर्वेक्षण पद्धत :-

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला जाणार आहे. 'प्रश्न विचारण्यासाठी काळजीपूर्वक आयोजित केलेली पद्धती आणि नमुना निवडीच्या शास्त्रीय पद्धती वापरून केलेले शैक्षणिक संशोधन म्हणजे सर्वेक्षण पद्धती होय'.

संशोधनाची साधने :-

संशोधनाची माहिती संकलित करण्यासाठी विविध साधनांचा उपयोग करावा लागतो. संशोधनासाठी जी गुणात्मक व संख्यात्मक माहिती किंवा आकडेवारी गोळा केली जाते त्यास आधारभूत सामग्री असे म्हणतात. संशोधनासाठी विविध साधने व तंत्रे उपयोग येतात त्यातील

Edit with WPS Office

सर्वेक्षण पद्धती माहिती संकलित करण्यासाठी उपयोगात येणारे **प्रश्नावली** व **मुलाखत** ही संशोधन साधने वापरली जाणार आहे.

जनसंख्या :-

शैक्षणिक संशोधनात जनसंख्या हा महत्त्वाचा घटक असून प्रस्तुत संशोधनाचे शीर्षक " आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांचा क्षमता, कौशल्य व सर्जनशीलतेचा त्यांच्या संपादणुकीवर होणारा परिणाम : एक सहसंबंधात्मक अभ्यास" या शीर्षकावरून असे स्पष्ट होते की, प्रस्तुत संशोधनासाठी ज्या शाळेत आदिवासी गोंड समाजातील विद्यार्थी आहे अशा किनवट माहूर तालुक्यातील सर्व शाळांचा समावेश करता येईल. .

न्यादर्श / नमुना निवड :-

आदिवासी गोंड विद्यार्थी ज्या शाळेत राहतात अशा शाळेतील 200 विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. म्हणून प्रस्तुत संशोधन समस्येसाठी न्यादर्श म्हणून असंभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक पद्धती निवडण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

व्याप्ती :-

जगामध्ये ज्ञान अथांग सागराप्रमाणे आहे. त्या सर्वांचा अभ्यास करणे अशक्य अशी बाब आहे. म्हणूनच प्रस्तुत संशोधन आदिवासी गोंड जमातीचे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूक इवर परिणाम करणाऱ्या त्यांच्या क्षमता कौशल्य व त्यांच्यातील सर्जनशीलता या घटकांचा अभ्यास केला जाणार आहे. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही आदिवासी तील गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या संदर्भाने येणाऱ्या सर्व घटकांचा व्याप्तीत समावेश करण्यात आलेला आहे किनवट माहूर तालुक्यातील गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास या संशोधनात केला जाणार आहे

मर्यादा :-

कोणत्याही संशोधनाला मर्यादा या पडतातच कारण संशोधकाला मिळणारा वेळ, श्रम व पैसा या सर्व बाबींचा त्यांच्या संशोधनावर परिणाम पडतो. प्रस्तुत संशोधनाची मर्यादा खालील प्रमाणे आहेत.

1)प्रस्तुत संशोधनाची मर्यादा ही फक्त आदिवासी गोंड जमातीच्या विद्यार्थ्यां पुरतीच मर्यादित आहे.

2)प्रस्तुत संशोधन हे किनवट व माहूर तालुक्या पुरते मर्यादित आहे.

3)प्रस्तुत संशोधन गोंड जमातीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता, कौशल्य व सर्जनशीलता या घटका पुरते मर्यादित आहे

4)प्रस्तुत संशोधनात आदिवासी जमातीतील गोंड विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूकीचा अभ्यास केला जाणार आहे.

Edit with WPS Office

माहितीचे विश्लेषण :-

संशोधन करीत असताना प्रश्नावली व मुलाखतीच्या आधारे जी माहिती प्राप्त होणार आहे. तिचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन करण्यात येणार आहे.

प्रकरण योजना :-

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण पहिले हे प्रस्तावनेचे असून यामध्ये संशोधनाची गरज व महत्त्व, संशोधन समस्या, कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, परिकल्पना आणि संशोधनाची व्याप्ती व मर्यादा इ. घटकांचा आभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : संबंधित साहित्याचा आढावा

सदरील प्रकरणांमध्ये संशोधन समस्यांशी निगडीत साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यामध्ये पूर्व संशोधनाचा आढावा, संबंधित ग्रंथ , वर्तमानपत्रे व नियतकालिकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : संशोधनाची कार्यपद्धती

सदरील प्रकरणामध्ये संशोधन म्हणजे काय ? संशोधनाची व्याख्या, संशोधनाच्या पद्धती, प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेली संशोधन पद्धती, संशोधन साधने, साधनांची निर्मिती व प्रत्यक्ष कार्यवाही इ. बाबींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे :- माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

सदरील प्रकरणांमध्ये प्रश्नावली व मुलाखतीच्या आधारे जी माहिती प्राप्त होईल तिचे विश्लेषण करून निरीक्षणा आधारे अर्थनिर्वचन करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

सदरील प्रकरणातमध्ये प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारे संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी यांची माहिती दिली जाणार आहे. तसेच पुढील संशोधनासाठी नवीन विषय सुचविण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :-

1)भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 2013

2)आदिवासी जीवन कथा आणि व्यथा, सुरेश कोडीतकर, सुगावा प्रकाशन पुणे,प्रथमावृती 2008

3)आदिवासी अस्मितेचा शोध, प्रा. माधव सरकुंडे, देवयानी प्रकाशन नागपूर, प्रथम

Edit with WPS Office

आवृत्ती 2007

4)आदिवासींची शैक्षणिक स्थिती, डॉ.विनोद रायपूरे व डॉ. संभाजी देसाई, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, तृतीयावृत्ती 2011

5)आदिवासींचे शिक्षण, डॉ. गोविंद गारे, साकेत प्रकाशन औरंगाबाद, नवीन आवृत्ती 2009

6)आदिवासी समाजाचे दारिद्र्य, प्रा. डॉ. सुदर्शन देशमुख, निर्मल प्रकाशन नांदेड,प्रथमावृती 2007

7)शैक्षणिक संशोधन पद्धती, डॉ.वी.रा.भिंताडे, नूतन प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती 2007

8)शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, मुळे व उमाटे, विद्या प्रकाशन औरंगाबाद, द्वितीयावृती 2010

9)महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, डॉ. गोविंद गारे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,तृतीयावृती 2012

संशोधक. मार्गदर्शक

अरुण कांबळे. प्राचार्य डॉ.मारोती माने

Edit with WPS Office